(1)

जावक क्रमांक 7169/13

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

31 OCT 2013

जावक क्रमांक :-सलेअ/अंदाज शाखा/

GBR

परिपत्रक क्रमांक ३८४ दिनांक 31/10/2013

धर्मादाय संघटनेतील सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालयांमधील सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी तसेच सर्व नोंदणीकृत सार्वजनिक न्यासांचे विश्वस्तांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ३४(१) व ३४(१ ए) च्या, तरतूदीच्या अनुषंगाने लेखावर्षाअखेरची लेखापरिक्षण केलेली विहित नमुन्यातील हिशोबपत्रके धर्मादाय उप आयुक्त/ सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे विहीत मुदतीत दाखल करणे आवश्यक आहे.

हिशोबपत्रके दाखल करताना ती महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवथा नियम १९५१ अन्वये विहीत केलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने परिपूर्ण असणे अत्यंत गरजेचे आहे. या संदर्भात , खालील आवश्यक बाबींची पूर्तता करण्याची दक्षता घेण्यांत यावी.

१) हिशोबपत्रके महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५१ अन्वये विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यांत व मूळ प्रतीत असणे आवश्यक आहे. हिशोबपत्रके तयार करताना, विहीत नमुन्यातील न्यासांशी संबंधित नसलेली शीर्षे वगळण्यांत येऊ नयेत. विहीत नमुन्यांत नसलेली, तसेच, छायांकित अथवा दुय्यम प्रतीतील तसेच खाडाखोड उपरिलेखन असलेली हिशोबपत्रके मान्य करण्यात येणार नाहीत.

२) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम, १९५१ च्या नियम २१ अन्वये विहीत केलेल्या मुदतीनंतर हिशोबपत्रके दाखल करीत असल्यास, विश्वस्तांनी विलंबाचे कारण नमूद केलेला विलंब माफीचा अर्ज रु.१०/-च्या कोर्ट फी स्टॅम्पसह हिशोबपत्रकांसोबत प्राधिकृत अधिकाऱ्यासमोर सादर करावा.

३) हिशोबपत्रकांवर न्यासाचे पूर्ण नांव, पत्ता, न्यास नोंदणी क्रमांक व दिनांक, विश्वस्तांच्या स्वाक्षऱ्या, सनदी लेखापालाची सही, शिक्का, पत्ता, सदस्यत्व क्रमांक व दूरध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. उपरोक्त तपशील व संबंधितांच्या स्वाक्षऱ्या नसलेली हिशोबपत्रके स्वीकारण्यांत येणार नाहीत. हिशोबपत्रके पॅनेलवरील अधिकृत लेखा परिक्षकाने प्रमाणित केली असल्यास, त्या पृष्ठयर्थ धर्मादाय आयुक्तांनी सदर कालावधीसाठी दिलेल्या नियुक्ती आदेशाची प्रत सोबत जोडणे अनिवार्य राहील.

शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक बीपीटी १३८५/४६/(५३)-VI दिनांक ११/२/१९९१ अन्वये पुढील न्यासांनी अनुसूची ९ अ व ९ ब मध्ये हिशोबपत्रके सादर करावीत व त्यावर किमान तीन विश्वस्तांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात.

(अ) ढोबळ वार्षिक उत्पन्न रु.५०००/-च्या विहीत मर्यादेत असलेले न्यास

(ब) शासन त्यांचे अधिकाऱ्याव्दारे प्रशासन करीत असलेले सार्वजनिक न्यास

(क) स्थानिक प्राधिकरणाव्दारे व्यवस्थापन होत असलेले सार्वजनिक न्यास

(ड) महालेखाकार यांचेव्दारे हिशोब तपासणी होत असलेले सार्वजनिक न्यास

(इ) स्थानिक निधी लेखा विभागाव्दारे हिशेब तपासणी होत असलेले सार्वजनिक न्यास

उपरोक्त (ब) ते (इ) यांचेबाबतील महालेखाकर/स्थानिक निधी लेखा विभाग यांनी केलेल्या लेखा परिक्षण अहवालाची प्रत हिशोबपत्रकासोबत सादर करण्यांत यावी.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम, १९५१ च्या नियम २१ (१-ब) नुसार कलम ३३ च्या उपबंधाखाली लेख्यांची कोणतीही विवरणे सादर करण्याची कोणत्याही विश्वस्तांस सवलत देण्यांत आली असेल, त्याबाबतीत आर्थिक वर्ष संपल्यापासून तीन महिन्यांच्या मुदतीच्या आत त्यांच्या उत्पन्नाच्या मर्यादेबाबतचे शपथपत्र धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांना सादर करतील.

५) न्यासाचे शाळा,दवाखाने, इ. स्वरुपाचे उपक्रम असल्यास, सदर उपक्रमांची हिशोबपत्रके मुख्य हिशोबपत्रकासोबत जोडावीत व एकत्रित विवरणपत्र सादर करावे.

६) चालू वर्षात प्राप्त झालेले कायम विश्वस्त निधी (Corpus Fund) व इतर विशिष्ट फंडातील (Earmarked Fund) देणग्याबाबत, सदर देणग्या या कायम विश्वस्त निधीचा/इतर विशिष्ट निधीचा भाग म्हणून प्राप्त झाल्याचे सनदी लेखापालाचे/अधिकृत लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

७) विश्वस्त निधी व इतर निधीचा विनीयोग केला असल्यास, त्याची योग्य रितीने उत्पन्न-खर्च विवरणपत्रात नोंद घेऊन, सदर खर्चाचा विशेष तपशील सादर करावा.

न्यासाने, विश्वस्तांना अगर अन्य व्यक्तिस/संस्थेस कर्ज दिले अथवा घेतले असल्यास त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ३६(अे) (३) अन्वये धर्मादाय आयुक्तांची पूर्व मंजूरी घेतल्याच्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

९) न्यासाची स्थावर मिळकत (Property) विक्री केली असल्यास अथवा भाडेपट्टीने दिली असल्यास, सदर व्यवहारास महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ३६(अ) (ब) अन्वये धर्मादाय आयुक्तांची पूर्व मंजूरी घेतल्याच्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

१०) परिशिष्ट ९ क मध्ये वजावट मागण्यात आलेल्या खर्च/उत्पन्न बाबींसंदर्भात खालील प्रमाणे तपशील देणे आवश्यक आहे ---

अ) अन्य न्यासांकडून प्राप्त झालेल्या देणगी रकमांबाबत संबंधित न्यासाचे नाव, नोंदणी क्रमांक, पत्ता, देणगी रक्कम याचा तपशील दर्शविणारी यादी

ब) शासन अथवा स्थानिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या अनुदान रकमांबाबत संबंधित शासन/ स्थानिक संस्थेच्या अनुदान मंजूरीच्या पत्राची प्रत.

क) सिलिंग निधी/घसारा निधीवरील संबंधित गुंतवणूक तपशील व व्याज परिगणना पत्रक

ड) शैक्षणिक खर्च,वैद्यकीय मदत व पशु वैद्यकीय खर्च याखलील वजावटीकरता पुढीलप्रमाणे पूर्तता करावी-१) लाभार्थी, व्यक्ती असल्यास, व्यक्तिचे पूर्ण नांव, पत्ता,रक्कम व प्रयोजन दर्शविणारे विवरणपत्र जोडावे. २) लाभार्थी, संस्था असल्यास, त्याचा न्यास नोंदणी क्रमांक द्यावा व विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate ) जोडावे. ३) शाळा, दवाखाना, वसतीगृह, वाचनालय, इ. उपक्रम चालवत असल्यास, त्याचे स्वतंत्र उत्पन्न-खर्च/नफा —तोटा पत्रक द्यावे व एकाहून अधिक उपक्रमांच्या बाबतीत सर्व उपक्रमांचे एकत्रित विवरणपत्र (Consolidated Statement) जोडावे. एकत्रित विवरणपत्राच्या बेरजेनुसार, मुख्य हिशोबपत्र तयार करावे.
४) शैक्षणिक/वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले असल्यास, त्याचा दिनांक, ठिकाण,इ. तपशील द्यावा.

इ) दुष्काळ, पूर, नैसर्गिक आपत्ती, इ. वर केलेल्या खर्चाबाबत आपत्तीचा कालावधी, ठिकाण याचा व खर्चाचा बाबनिहाय तपशील द्यावा. तसेच, संबंधित वर्षात वर्गणी / देणग्या त्याच कारणाकरता जमा केली आहे, अशा आशयाचे सनदी लेखापालचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

भाडयाने न दिलेल्या इमारतींच्या दुरुस्तीवरील खर्चासंदर्भात स्थानिक संस्थेचे/अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचे अंदाजित वार्षिक भाडयाबाबतचे (Reteable Value) प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

उ) शेतीकरीता वापरातील जमिनीवरील उत्पन्नाबाबत वजावट मागितली असल्यास, शेतमालाच्या उत्पादनावरील खर्चाचा (Production Cost) तपशील, भाडे/कर भरणा केल्याबद्दलच्या पावतीची प्रमाणित प्रत सोबत जोडावी.

ऊ) बिनशेती वापरातील जमिनीवरील उत्पन्नाबाबत वजावट असल्यास, भाडे स्वरुपात प्राप्त झालेल्या रकमा, तसेच कर निर्धारण, सेस व इतर शासकीय येणे, स्थानिक व इतर करांचे बाबतीत रक्कम भरणा केल्याच्या पावतीची प्रमाणित प्रत जोडावी.

ए) गुंतवणुकीवरील उत्पन्नावर १% वजावट मागत असल्यास, गुंतवणूक प्रकारानुसार करण्यांत आलेल्या खर्चाचा तपशील द्यावा. तसेच सदर खर्च उत्पन्न-खर्च विवरणपत्रात (Schedule-IX) मध्ये दर्शविणे आवश्यक राहील.

११) न्यासांनी मोठया प्रमाणावर उत्पन्नापेक्षा जास्त खर्च केलेला असल्यास याबाबत खर्चाचा तपशील खुलाशासह सादर करावा. तसेच सदरचा अधिकचा खर्च कोणत्या खात्यातून केला ते स्पष्ट करावे.

१२) कायम विश्वस्त निधी (Corpus Fund) व इतर (विशिष्ट) निधी (Other Earmarked fund) यांची योग्य प्रमाणात गुंतवणूक केलेली नसल्यास खुलासा करावा.

१३) चालू खात्यात व हातात मोठया प्रमाणात रकमा शिल्लक ठेवलेल्या असल्यास त्या मान्यता प्राप्त संस्थेत/बँकेत त्वरित गुंतविण्यांत याव्यात व तसा खुलासा करावा.

१४) सनदी लेखापालाच्या/ अधिकृत लेखा परिक्षकाच्या अहवालामध्ये प्रतिकूल शेरे असल्यास त्याबाबत पूर्तता करावी.

१५) न्यासाची मिळकत ही न्यास मिळकत म्हणून नोंदविली आहे की नाही, नसल्यास त्वरित धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे विहित मुदतीत रितसर फेरफार अर्ज (शेडयूल ३) करुन न्यासाची मिळकत ही न्यास मिळकत म्हणून नोंद करुन घेणे.

१६) महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम ३१ (ए) प्रमाणे वित्तीय वर्ष सुरु होण्यापूर्वी १ महिना आधी अंदाजपत्रक (बजेट) दाखल करावे.

१७) महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम ३४(१) व (२) अन्वये न्यासांनी हिशोबपत्रके विहीत नमुन्यांत तयार करुन ती धर्मादाय उप आयुक्त/ सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयांत सादर करणे, तसेच संबंधित न्यासाच्या आर्थिक व्यवहारामधील अनियमितता,गैरव्यवहार, निधीचा अपहार इ. प्रकरणे लेखपालांच्या अहवालात विनिर्दिष्टपणे निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबंधित हिशोब तपासनीसाची आहे याची नोंद घ्यावी.

हिशोबपत्रके दाखल करताना, वर नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करण्यांची दक्षता घेण्यांत यावी. दाखल केलेल्या हिशोबपत्रकांबाबत प्रकरणपरत्वे अधिक खुलासा मागण्यांचे अथवा कागदपत्रांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० च्या कलम ३८ अन्वये धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांना राहतील.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई